# दिवाळी अंक रंगदीप २०२० साठी आवाहन!

'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' आणि 'मराठी विश्व, न्यू जर्सी' तर्फे प्रसिध्द होणाऱ्या 'रंगदीप' या दिवाळी अंकाच्या तिसाव्या अंकासाठी स्वत:चे मराठी साहित्य किंवा कलाकृती पाठवण्याचे आवाहन आम्ही मराठी लेखक, कवी, चित्रकार यांना करीत आहोत.

१९७० साली 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' ची स्थापना झाली. यंदाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षासाठी 'लखलख सोनेरी' ही मध्यवर्ती कल्पना ठेऊन साहित्य अपेक्षित आहे. उदा. आयुष्यातील सोनेरी क्षण, सोनेरी आठवणी, सुवर्णसंधी, कुठल्याही कलेचा/शास्त्राचा/संस्थेचा/साम्राज्याचा इ. सुवर्णकाळ, सोने, सुवर्णमहोत्सव वगैरे. याशिवाय इतर साहित्यही (उदा. प्रवासवर्णन, व्यक्तीचित्र, मुलाखत इ.) स्वागतार्ह आहे.

* **अपेक्षित साहित्य व शब्दमर्यादा**: कथा/लेख (१५०० शब्द), कविता (२० ओळी), पाककृती (३०० शब्द) - प्रत्येक साहित्यिकाची फक्त एकच लेख / गोष्ट / कविता प्रकाशित केली जाईल.

* **मुखपृष्ठ:** हे चित्र अथवा रेखाटन या स्वरूपात ८.५" X११" असावे. त्यात आवश्यक ते बदल करण्याचे हक्क रंगदीप समितीला असतील.

* **वेगळ्या वाटा:** विविध क्षेत्रांत लक्षणीय कर्तृत्व गाजवून इथल्या मातीत झेंडा रोवणाऱ्या मराठी व्यक्तींवर लेख.

* **नवदीप /The Youth Corner:** We are excited to invite second generation Marathi Americans to contribute to the Youth Corner. Please send your original unpublished work such as short-stories, poems, articles, recipes in Marathi or English as well as drawings, paintings, cartoons, photos. Please send your material by August 15th 2020.

* **साहित्य पाठवण्याचे नियम आणि मुदत**:

१. साहित्य आपले स्वत:चे असावे; इतरत्र कुठेही, छापील अथवा सोशल मिडीयावर पूर्वप्रकाशित झालेले नसावे. रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे. Copyright requirement असल्यास आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.

२. मराठी टंकलेखनासाठी किरण (किंवा गुगल मराठी) फॉण्ट वापरावा. http://kiranfont.com/ या वेबसाईटवर किरण फॉण्ट व त्याबद्दलची माहिती उपलब्ध आहे. किरण किंवा युनिकोड/गुगल मराठी मध्ये टाईप करून document format मध्ये पाठविलेल्या साहित्याला प्राधान्य दिले जाईल.

३. साहित्याच्या निवडीत समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुध्दलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क समितीला आहे.

४. साहित्याबरोबर स्वत:चा संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-मेल पत्ता पाठवणे आवश्यक आहे.

५. न्यू यॉर्क व न्यू जर्सीच्या साहित्यिक/कलाकारांना प्राधान्य दिले जाईल. न्यू यॉर्क व न्यू जर्सीच्या बाहेर कदाचित अंक टपालाने पाठविता येणार नाही.

६. साहित्याचा / कलाकृतीचा मोबदला / मानधन दिले जात नाही.

⁕ **साहित्य पाठवायचा ई-मेल पत्ता:** rd20editor@gmail.com

⁕ साहित्य, जाहिराती आणि शुभेच्छा संदेश पाठवण्याची **अंतिम तारीख: १५ ऑगस्ट २०२०**

⁕ अंकासाठी स्वीकारलेल्या साहित्यापैकी उत्कृष्ट लेख/कविता यांना **'संपादकांची पसंती'** ने गौरविण्यात येईल.

⁕ **काव्यस्फूर्ती (कविता स्पर्धा):** या वर्षी कविवर्य **वसंत बापट** यांच्या **'गगन सदन तेजोमय'** या काव्यातील पुढील ओळी काव्यस्फूर्ती स्पर्धेसाठी निवडल्या आहेत.

***तिमिर हरून करुणाकर***

***दे प्रकाश, देई अभय***

वर दिलेल्या या ओळी तुमच्या कवितेच्या सुरूवातीला, शेवटी किंवा मधे कुठेही वापरू शकता. तुमची रचना २० ओळींपर्यंत मर्यादित असावी. सर्वोत्कृष्ट दोन कवितांना प्रत्येकी १०० आणि ५० डॉलर्स बक्षीस देण्यात येईल. **काव्यस्फूर्ती कविता पाठविण्याची अंतिम तारीख: ३० ऑगस्ट २०२०**

⁕ **रंगदीप शब्दकोडे स्पर्धा:** 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' चे ज्येष्ठ सभासद श्री. विनायक दामले यांनी तयार केलेले शब्दकोडे, स्पर्धेचे नियम आणि संपर्क विषयक माहिती 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' www.mmny.online व 'मराठी विश्व, न्यू जर्सी' www.marathivishwa.org यांच्या संकेतस्थळांवर ठेवण्यात येतील. **स्पर्धकांची उत्तरे आम्हाला ३० ऑगस्ट २०२० पर्यंत मिळाली पाहिजेत.** अचूक शब्दकोड्यांना $१००.०० विभागून देण्यात येतील.

⁕ **जाहिराती आणि शुभेच्छा संदेश देण्यासाठी संपर्क:**

डॉ. सोनिया शेट्ये, न्यू यॉर्क: dilipshetye@gmail.com

अतुल आठवले, न्यू जर्सी: atulathavaleaa@gmail.com

धन्यवाद!

**नीता नाबर (संपादिका), शिरीन म्हाडेश्वर (सहसंपादिका) आणि 'रंगदीप २०२०' समिती**

(रंगदीप २०२० चा अंक छापण्यासाठी रंगदीप टीम प्रयत्नांची शिकस्त करणार आहे, परंतु कोरोनामुळे काही अडचणी आल्यास कदाचित ई-अंक / ई-प्रकाशन / विलंबित वितरण करावे लागेल.)